गोमंतक मराठा समाजाची मुखपत्रिका

# गोमंतश्री



वर्ष ४५ वे क्रमांक २६५ डिसेंबर २०२०

# गोमंतक मराठा समाज, गोवा
## केंद्रिय कार्यकारी समिती २०२०-२३

| | नाव | पद | मो. क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद घ. वाघुर्मेकर | अध्यक्ष | ९८२३०३५१५१ |
| २. | श्री. विनोद प्र. जांबावलीकर | उपाध्यक्ष | ९८२३६९५५७४ |
| ३. | श्री. मंगेश भि. कुंडईकर | चिटणीस | ९८२२१२१८९४ |
| ४. | श्री. सतीश अ. पैंगिणकर | संयुक्त चिटणीस | ९४२३१८०५२५ |
| ५. | श्री. श्रीकृष्ण ह. आसगांवकर | खजिनदार | ७८७५३४५६७६ |
| ६. | सौ. उत्कर्षा उ. बाणस्तारकर | सदस्य | ९०९६६९९४०१ |
| ७. | ॲड. हर्षा रा. नाईक | सदस्य | ९५५२८७६५७८ |
| ८. | श्री. लक्ष्मीकांत एस. नाईक | सदस्य | ९९२३९२२२१२ |
| ९. | श्री. सुनील एस. फातर्पेकर | सदस्य | ९९२१०१६१४८ |
| १०. | श्री. जितेंद्र ना. शिरगांवकर | स्विकृत सदस्य | ७७२०९७३९६५ |
| ११. | श्री. सुनील र. पिळगांवकर | स्विकृत सदस्य | ८००७१२२५३३ |
| १२. | श्री. कपिल कि. कोरगांवकर | स्विकृत सदस्य | ८४११९४९०४५ |
| १३. | श्री. गोरख रा. मांद्रेकर | भूतपूर्व अध्यक्ष | ९९६०४०१९२० |
| १४. | श्री. सुरेंद्र वळवईकर | अंतर्गत हिशेब तपासनीस | ९४२३८८२२०३ |
| १५. | श्री. श्रीपाद रामा आमोणकर | अंतर्गत हिशेब तपासनीस | ९८८१७१२४४० |


# गोमंतक मराठा समाज, गोवा

# त्रैमासिक मुखपत्रिका

**ऑक्टोबर २०२० – डिसेंबर २०२०**

# संपादकीय...

**श्री. नितीन कोरगांवकर**
ज्येष्ठ पत्रकार तथा कलाकार
मोबाईल : ९४२२४४३५१८



## महिला आणि सामाजिक नेतृत्व

आज महिला पुरुषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात चमकत आहेत. त्यांची उंच भरारी थक्क करणारी आहे. राष्ट्रपतीपदावर आपली मराठी महिला पोचते हे केवढे मोठे भूषण!

एककाळ असा होता, की 'चूल आणि मूल' एवढेच कर्तृत्व महिलांच्या वाट्याला आले होते. परंपरागत बंधनांमुळे स्त्रिया घराबाहेर पडून आपले कर्तृत्व सिद्ध करू शकत नव्हत्या. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी, महिला शिक्षित व्हाव्यात म्हणून चळवळ उभारली आणि महिलांना शिक्षणाची कवाडे खुली झाली आणि करता करता, समाजबंधने झुगारून सुशिक्षित स्त्रिया स्वकर्तृत्वाने तळपू लागल्या. विविध क्षेत्रे त्यांनी पादाक्रांत केली. नेतृत्वगुण विकसित करून समाजाला दिशा देण्यात त्या यशस्वी झाल्या. पुरुषांची मक्तेदारी मोडून सर्व क्षेत्रात स्त्रिया नेतृत्व करू लागल्या, शिक्षण, समाजकारण, राजकारण, उद्योगव्यवसाय, कला, संशोधन आदी सर्वच क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविला. निर्णय क्षमता त्यांनी सिद्ध करून दाखविली.

स्वातंत्र्यानंतर आणि आपल्या गोव्याला परकीय राजवटीतून मुक्ती मिळाल्यानंतर गोव्यातील महिलाही कर्तृत्व बजावू लागल्या. गोव्याचे भाग्य विधाते व पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांचे देहावसान झाल्यावर मुख्यमंत्रीपद त्यांच्या कन्या शशिकलाताई काकोडकर यांनी स्वीकारावे म्हणून त्यांच्यावर ऐनवेळी जबाबदारी सोपविण्यात आली. सुशिक्षित, सुसंस्कृत असलेल्या ताईंकडे अनुभव नव्हता, परंतु ते पद स्वीकारल्यानंतर अभ्यासूवृत्ती, शिस्त व निर्णयक्षमता यांच्या जोरावर त्यांनी या पदाची शान वाढविली. उत्कृष्ट प्रशासक म्हणून आपला वेगळा ठसा उमटविला. त्यांच्या कारकीर्दीत राजकीय

पारदर्शकतेचा आदर्श त्यांनी निर्माण करून आपल्या गोमंतक मराठा समाजाला भूषणावह ठरेल अशी कामगिरी बजावली.

तात्पर्य, शशिकलाताईंच्या स्मरणार्थ गोमंतक मराठा समाजातर्फे नुकताच मातृमेळावा पार पडला, त्या अनुषंगाने आपल्या महिलांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन नेतृत्त्वगुण विकसित करावे व समाजाचे नेतृत्व करण्यास पुढे यावे असे आम्हाला वाटते. कारण हा मेळावा म्हणजे केवळ औपचारिकता नव्हे तर त्यामागे कल्याणकारी हेतू आहे. महिलांनी समाजाचे नेतृत्व करण्यासाठी पुढे आले पाहिजे हा संदेश संस्थेच्या कार्यकारी मंडळाला सर्वांपर्यंत पोहचवायचा आहे.

महिला ज्यावेळी समाजाचे नेतृत्व करतात त्यावेळी निश्चितच त्यांचा दृष्टिकोन हा निकोप असतो. आज राजकारणात मूल्यांची झालेली घसरण अत्यंत लाजिरवाणी आहे. अशावेळी महिलांचे नेतृत्व पुढे आले तर राजकारणाचे शुद्धीकरण होण्यास मदत होईल असे आम्हाला मनापासून वाटते. राजकारण हे व्यक्तिगत स्वार्थासाठी, एकमेकांचे पाय ओढण्यासाठी, भ्रष्टाचाराची बीजे रुजवण्यासाठी नाही तर ते समाजाच्या, राज्याच्या व पर्यायाने देशाच्या उन्नतीसाठीचे साधन आहे याचे भान आज उरलेले नाही. या पार्श्वभूमीवर महिलांचे राजकीय क्षेत्रात जर भक्कम नेतृत्व लाभले तर ही परिस्थिती सुधारायला, बदलायला निश्चितच मदत होईल. तेव्हा महिलांनी समाजाचे नेतृत्व करण्यासाठी मोठ्या संख्येने पुढे येणे ही काळाची गरज बनली आहे.

स्व. शशिकलाताईंच्या ८६ व्या जयंतीप्रित्यर्थ गोमंतक मराठा समाजातर्फे झालेल्या मातृमेळाव्याचे उद्दिष्ट लक्षात घेऊन महिलांनी समाजाचे नेतृत्व करण्यास पुढे यावे व महिला नेतृत्वाचा आदर्श समाजात निर्माण करावा. अनेक जबाबदाऱ्या स्त्रियांच्यावर असतात हे वेगळं सांगायची गरज नाही, परंतु स्त्रियांमध्ये चिकाटी, कणखरपणा, जिद्द, सहनशिलता, संवेदनशिलता, ममत्व अशा अनेक गुणांचा समुच्चय असतो, तेव्हा अनेक जबाबदाऱ्या सांभाळून त्या समाजाचे नेतृत्व करू शकतात आणि त्याची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. तर महिलांनो, चला उचला पाऊल आणि तुमच्याबरोबर अनेक भगिनींना प्रोत्साहित करून समाजाचे नेतृत्व करण्यासाठी पुढे या व एक आदर्श समाजाची निर्मिती करण्यासाठी तुमचे कर्तृत्व पणाला लावा.

●●●

# अध्यक्षीय मनोगत



**श्री. आनंद घ. वाघुर्मेकर**
(बी.ई. (सिव्हिल) एम. टेक)
अध्यक्ष केंद्रिय समिती २०२०-२०२३
मोबाईल : ९८२३०३५१५१

## मातृदेवो भवः

स्त्री म्हणजे जिवनाची निर्मिती. तिचे अस्तित्व या जगात अनन्यसाधारण आहे. जीवन प्रवासात स्त्री ही कुणाची आई, बहिण, बायको, ह्या जबाबदाऱ्या पेलण्यास समर्थ उभी असते.

गोमंतक मराठा समाजात मातृशक्तीला अनन्य साधारण महत्त्व आहे. हा समाज आपल्या माता-भगिनींनी आपल्या स्वकष्टाने उभा करण्यात खुप योगदान दिलेले आहे. भूतकाळात उपेक्षित जगणे जगताना काळाची पुढील पावले ओळखत आपला समाज शिक्षित, सुदृढ आणि बलवान व्हावा यासाठी खुप खस्ता खाल्लेल्या आपणाला दिसतात. या गोष्टीचे सदैव स्मरण आम्ही केले पाहिजे. ज्ञानाची कवाडे उघडून ज्ञानधिष्ठित समाज घडवणाऱ्या मातृशक्तीला मी वंदन करतो. आपला समाज हा मातृसत्ताक समाज आहे. त्यामुळे मातृशक्ती जागृत करण्यासाठी दरवर्षी कै. शशिकलाताईंच्या जयंती निमित्त मातृमेळाव्याचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे ७ जानेवारी २०२१ रोजी त्याचे यशस्वीरित्या महिला वर्गाकडून आयोजन करण्यात आले त्यामुळे सर्व महिला वर्गाचे आभार.

प्रत्येक तालुक्यातून आज महिला समित्या स्थापन होत आहेत व खुप चांगल्या कार्यक्रमांचे आयोजन आपल्या भगिनी करताना दिसतात. आपल्या समाजाच्या पुढील वाटचालीसाठी महिला वर्गाचे योगदान खुप महत्त्वाचे आहे. सर्व मातृशक्ती एकत्र येऊन आपला समाज एक परिवार मानून सुसंस्कारीत पिढी घडवण्यासाठी आपले योगदान द्यावे असे आवाहन मी सर्व माता-भगिनींना करतो.

●●●

स्व. शशिकलाताई काकोडकर यांना त्यांच्या जयंतीदिनी

# विनम्र अभिवादन



गोव्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री व

गोमंतक मराठा समाजाच्या आधारस्तंभ आदरणीय

# स्व. शशिकलाताई काकोडकर

यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त,

गोमंतक मराठा समाज केंद्रीय समिती,

तालुका समित्या व समाज बंधू-भगिनींतर्फे

***विनम्र आदरांजली.***

# ‘मातृमेळावा २०२१’ निमित्त श्री. यतीन काकोडकर यांनी आपल्या भाषणांतून व्यक्त केलेले विचार...



गोव्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री आणि ज्यांची तुलना ‘आयर्न लेडी ऑफ गोवा ३९’ म्हणून केली जायची. त्या गोव्याचे भाग्यविधाते स्वर्गीय भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ज्येष्ठ कन्या व आमच्या मातोश्री म्हणजेच शशिकलाताई काकोडकर यांचा जन्म ७ जानेवारी १९३५ रोजी पेडणे या गावी झाला. त्यांचे शिक्षण M. A. पर्यंत झाले होते आणि धारवाड विद्यापीठाची मानद डॉक्टरेट त्यांना प्राप्त झाली होती. शशिकलाताई ह्या तमाम गोमंतकीय जनतेला आपल्या बहिणीप्रमाणे होत्या म्हणून समस्त गोवेकर त्यांना ताई म्हणून हाक मारायचे.

भाऊंना त्यांच्या व्यवसायात मदत करीत असतानाच त्यांना भाऊकडून राजकारणाचे बाळकडू मिळाले आणि त्यानंतर त्यांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली. शिक्षण, सार्वजनिक विभाग, आरोग्य व समाज कल्याण अशी अनेक खाती त्यांनी उत्तमरीत्या सांभाळली. गोमंतकीय महिलांना सक्षम करण्यासाठी समाज कल्याण खात्या अंतर्गत त्यांनी अनेक निर्णय घेतले त्यातून महिलांना स्वतःच्या विकासात कमीपणाची जाणीव भासली नाही.

पिण्याच्या पाण्याची सोय, शहरांना आणि गावांना जोडणारे पक्के रस्ते, सार्वजनिक आरोग्य सुविधा, उच्च शिक्षणाच्या सोयी, औद्योगिक व आर्थिक महामंडळाची स्थापना आदी प्रकल्प त्यांनी चालीस लावले. ताई भारत देशातील तिसऱ्या महिला मुख्यमंत्री होत्या. प्रथम सुचेता कृपलानी, दुसऱ्या नंदिनी सत्पथी तर शशिकलाताई तिसऱ्या महिला मुख्यमंत्री ठरल्या आहेत. भाऊसाहेब

बांदोडकरांप्रमाणे ताई देखील भ्रष्टाचारविरोधी स्वभावाच्याच होत्या. गोव्याची राजकीय धुरा सांभाळतानाच त्यांनी त्यांच्या आवडीच्या कला, संस्कृती, समाजकार्य, वाचन, या कला जोपासल्या.

गोवा दमण आणि दिव संघ प्रदेशाच्या पहिल्या महिला मुख्यमंत्रीपदाची धुरा भाऊसाहेब बांदोडकर यांच्या मृत्यूनंतर समर्थपणे सांभाळून ताईंनी नवा इतिहास घडवला. राष्ट्रीय महिला आयोग, अखिल भारतीय महिला संघामध्ये कार्यरत असताना त्यांनी स्त्री मुक्ती आणि सबलीकरणासाठी सातत्याने ध्यास घेतला.

गोमंतकातल्या गावडा जमातीतल्या महिलांच्या प्रगतीसाठी विशेष योजना राबवली. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण मंत्रिपद सांभाळताना गोव्यातल्या गावो-गावी शालेय शिक्षण पोहचवले म्हणून इथल्या स्त्रियांना सुशिक्षित होऊन उत्तुंग भरारी घेण्याचे बळ त्यांनी प्रदान केले. शशिकलाताई मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. सर्वात मोठा निर्णय म्हणजे कुळांना व मुंडकाराना न्याय हक्क मिळवून दिला. त्यासाठी त्यांनी कायदा तयार केला. गोवा कुळ मुंडकार संवर्धन कायदा अंतर्गत कसेल त्यांची जमीन आणि राहत्या घराचा मालकी हक्क देणे हे ते दोन कायदे होते.

हजारो लोकांना विशेषतः शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला. आज देशातील जी काही मोजकीच असलेली संस्कृती केंद्रे आहेत त्यात गोवा कला अकादमीचा समावेश आहे. या कला अकादमीची स्थापना स्वर्गीय भाऊसाहेब बांदोडकर यांनी केली होती. मात्र खऱ्या अर्थाने अकादमीची रचना हि ताईंनीच केली होती म्हणून आज या व्यासपीठावर पुरुषांप्रमाणे महिला देखील दिमाखात आपल्या अंगात असलेल्या कला-कौशल्याचे सादरीकरण करताना दिसतात.

विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार ताईंनी सन १९७३ साली गोमंतकीय विद्यार्थ्यांना कदंब परिवहन महामंडळाच्या बसने राज्यात प्रवास करताना ५०% सवलत जाहीर केली. थेट ५०% सवलत देणारे बहुदा गोवा हे पहिलेच राज्य होते.

डिचोली तालुक्यात वेळगे येथे भाऊंनी माध्यमिक विद्यालय सुरु केले. भाऊंच्या नंतर ताईकडे या शिक्षण संस्थेची धुरा आली. पुढे ताईंच्या कारकिर्दीत ताईचे दिवंगत बंधू सिद्धार्थ यांच्या नावाने उच्च माध्यमिक विद्यालय सुरु करण्यात

आले. आज या शाळेची मुले राज्यस्तरावर व राष्ट्रीय स्तरावर चमकताना दिसतात. ग्रामीण भाग हा शिक्षणापासून वंचित राहू नये असा ताईचा प्रयास होता. मुलांची अडचण कळताच ताईंनी कित्येक मुलांना आर्थिक आधार दिला.

गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी विनामूल्य गाडीची व्यवस्था आजतागायत सुरु आहे. पुरुषांबरोबर महिलाही तेवढ्याच सक्षम असतात याचे उदाहरण स्वतः ताई झाल्या आणि आपल्या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून महिलांना सहभागी करून त्यांना स्वतःची ओळख निर्माण करायला एक मार्ग खुला करून दिला.

मराठी भाषा व माध्यमप्रश्न या दोन विषयांसाठी त्या शेवटपर्यंत लढत राहिल्या. शिस्तीच्या त्या एकदम पक्क्या होत्या. ताईंजवळ नेतृत्वाचे गुण होते, ज्यामुळे एक कार्यक्षम नेतृत्व म्हणून त्यांचे नाव इतिहासात नोंदले जाईल. अभ्यासू वृत्तीमुळे ज्या खात्याचा कारभार त्या सांभाळीत त्या खात्यातील अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर त्यांचा वचक व नियंत्रण असे. प्रशासकीय सेवेत त्यांनी शिस्त आणली व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा दिला.

उद्योग व्यवसाय क्षेत्रात पुरुषांबरोबर महिलांनी झेप घ्यावी म्हणून स्थापन केलेल्या आर्थिक विकास महामंडळात त्यांनी महत्वाचे योगदान केले. शिक्षण व ज्ञानरूपी लावलेल्या इवल्याश्या रोपाने आज महावृक्षाची जागा घेतलेली आहे, त्यामुळेच वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये गोमंतकीय महिला समर्थपणे पुढे येत आहेत.

गोव्याच्या राजकारणात आणि समाजकारणात दीर्घकाळ वावरणाऱ्या महिला म्हणून माजी मुख्यमंत्री शशिकलाताई काकोडकर यांचे नाव घ्यावेच लागेल. यशोदामिनी पुरस्काराने सन्मानित झालेल्या माझ्या आईने दि. २८ ऑक्टोबर २०१६ या दिवशी जगाचा निरोप घेतला. ताईंनी गोमंतकीय जनता आणि महिलांना आधारभूत ठरणारे घेतलेले निर्णय आणि त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण गोमंतकीयांच्या हृदयात भाऊंप्रमाणेच सदैव असेल.

धन्यवाद!

●●●

# स्व. शशिकलाताई काकोडकर यांच्या ८६ व्या जयंतीप्रित्यर्थ मातृमेळावा २०२१



मातृमेळावा २०२१ चे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना मा. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत उपस्थित मान्यवर



मातृमेळावा २०२१ चे दीप प्रज्वलन करताना श्री. यतीन काकोडकर. सोबत उपस्थित मान्यवर

गोमंतक मराठा समाज गोवातर्फे गोव्याच्या पहिल्या मुख्यमंत्री स्व. शशिकलाताई काकोडकर यांच्या ८६ व्या जयंती निमित्त ७ जानेवारी रोजी मातृमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला महिलांचा व समाजबांधवांचा उत्तम प्रतिसाद लाभला. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते संस्थेच्या सभागृहात मेळाव्याचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. सावंत यांनी, शशिकलाताईंनी कर्तृत्व व नेतृत्व सिद्ध केले. त्यांच्याकडून नव्या पिढीला शिकण्यासारखे पुष्कळ आहे असे गौरवोद्गार काढले.

संस्थेचे अध्यक्ष आनंद वाघुर्मेकर यांनी, स्वागतपर भाषणात शशिकलाताईंची जयंती राज्यपातळीवर साजरी करावी अशी सूचना केली



मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना उमेश नाईक.



मुख्यमंत्री प्रमोद सावंत ह्यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना श्री. दिपक बाणस्तारकर. सोबत उपस्थित मान्यवर.





**मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत ह्यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना डॉ. जयंती नायक तसेच दुसऱ्या छायाचित्रात ललना बखले सत्कार स्विकारताना. सोबत उपस्थित मान्यवर.**

तसेच पुढील काळात होणाऱ्या एका महत्त्वाच्या शासकीय प्रकल्पाला ताईंचे नाव द्यावे अशी सूचना केली. त्याला अनुसरून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी, आपली सहमती व्यक्त करून या संदर्भात ठोस पावले उचलली जातील असे अभिवचन दिले.

या कार्यक्रमाला व्यसपीठावर सन्माननीय पाहुणे शशिकलाताईंचे सुपुत्र तथा उद्योजक यतीन काकोडकर ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कामत, अंकोला नगरपालिकेचे अध्यक्ष भास्कर नार्वेकर, संस्थेचे सचिव मंगेश कुंडईकर,



**सन २०१९-२० सालातील उत्कृष्ट महिला समितीचा प्रथम पुरस्कार स्विकारताना फोंडा तालुक्याची महिला समिती तसेच उपस्थित मान्यवर.**



**सन २०१९-२० सालातील उत्कृष्ट महिला समितीचा द्वितीय पुरस्कार स्विकारताना बार्देश तालुक्याची महिला समिती तसेच उपस्थित मान्यवर.**



मा. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना कु. गायत्री उत्कर्ष आवडे.



स्व. शशिकलाताई काकोडकर यांच्या तैलचित्रा सोबत चित्रकार हृदयराज तांबोस्कर

कोषाध्यक्ष श्रीकृष्ण आसकावकर, संयुक्त सचिव सतीश पैंगिणकर, कार्यकारी सदस्य ॲड. हर्षा नाईक, सुनील फातर्पेकर, जितेंद्र शिरगावकर, सुनील पिळगावकर, लक्ष्मीकांत (सुदेश) नाईक, उत्कर्षा बाणस्तारकर, कपिल कोरगावकर उपस्थित होते.

डॉ. सावंत यांच्या हस्ते यावेळी शालांत दहावी परीक्षेत गोव्यातून प्रथम आलेली कु. गायत्री उत्कर्ष आवडे हिचा गौरव करण्यात आला. तसेच समाज कार्यकर्त्या डॉ. ललना बखले व डॉ. जयंती नायक (साहित्यिक व संशोधक) यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. दहावी व बारावी शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. उत्कृष्ट महिला समित्या - फोंडा तालुका (प्रथम) व बार्देश तालुका (द्वितीय) यांनाही पुरस्कार देण्यात आले.

या सोहळ्यात संस्थेच्या शैक्षणिक कर्ज योजनेला दोन दशके पूर्ण झाल्याब्दल उमेश नाईक, दीपक बाणस्तरकर, अरविंद वाडीकर, उदय बाळ्ळीकर,





स्व. शशिकलाताई काकोडकर यांची रांगोळी साकारताना कलाकार.



महिलांसाठी आयोजित तालुकास्तरिय नाट्यछटा स्पर्धेत प्रथम पारितोषिक स्विकारताना तिसवाडी तालुक्याचा संघ.



महिलांसाठी आयोजित तालुकास्तरिय नाट्यछटा स्पर्धेत द्वितीय पारितोषिक स्विकारताना काणकोण तालुक्याचा संघ.



महिलांसाठी आयोजित तालुकास्तरिय नाट्यछटा स्पर्धेत तृतिय पारितोषिक स्विकारताना फोंडा तालुक्याचा संघ.



स्व. शशिकलाताई काकोडकर यांच्या ८६ व्या जयंतीप्रित्यर्थ आयोजित मातृमेळावा २०२१ मध्ये सहभागी झालेला जनसमुदाय.

सुभाष साळकर यांचा सत्कार करण्यात आला. पैकी नाईक व बाणस्तरकर हे दोघेच उपस्थित राहू शकले. मातृमेळाव्यानिमित्त नाट्यछटा (तालुका महिला समित्यांसाठी) व खुली रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. 'घर सांभाळून सामाजिक दायित्व' या विषयवार झालेल्या परिसंवादात माजी मंत्री निर्मला सावंत, डॉ. अनिता तिळवे व ॲड. स्वाती केरकर यानी विचार मांडले. सौ. अनिता कवळेकर यांनी संचालन केले. मातृमेळाव्याचे सूत्रसंचालन सौ. उर्वशी कवळेकर यांनी केले. ●●●



नाट्यछटा सादर करताना काणकोण तालुक्यातील महिला समितीच्या सदस्य.



नाट्यछटा सादर करताना फोंडा तालुक्यातील महिला समितीच्या सदस्य.



नाट्यछटा सादर करताना तिसवाडी तालुक्यातील महिला समितीच्या सदस्य.



घर सांभाळून सामाजिक दायित्व या विषयावरील परिसंवादात सहभागी सौ. निर्मला सावंत, डॉ. अनिता तिळवे, ॲड. स्वाती केरकर, सौ. अनिता कवळेकर व उत्कर्षा बाणस्तारकर.

## गोमंतक मराठा समाजातर्फे स्व. शशिकलाताई काकोडकर यांना पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली




गोव्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री व गोमंतक मराठा समाजाच्या आदरणीय भगिनी स्व. शशिकलाताई काकोडकर यांना त्यांच्या चतुर्थ पुण्यतिथी दिनी गोमंतक मराठा समाजाच्या केंद्रीय समितीतर्फे २८ ऑक्टोबर २०२० रोजी श्रद्धांजली वाहण्यात आली.

गोव्याचे भाग्यविधाते स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांनी दाखविलेल्या मार्गावरून, पुढे निष्ठेने विकासाकडे व दुर्बलांच्या मदतीसाठी लक्ष केंद्रीत करून ताईंनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. कौटुंबिक जबाबदारी सांभाळून ताईंनी सामाजिक व राजकीय जीवनात प्रेरणादायी कार्य केले आणि गोव्यातील महिलांपुढे आदर्श ठेवला, अशा शब्दात याप्रसंगी पदाधिकाऱ्यांनी श्रद्धांजली वाहिली.

प्रारंभी ताईंच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहण्यात आली. यावेळी केंद्रीय समितीच्या सदस्या सौ. उत्कर्षा बाणस्तारकर व ॲड. हर्षा नाईक, तिसवाडी तालुका सचिव प्रशांत माशेलकर, धारबांदोडा तालुका समिती सचिव मंगेश देवळी व कर्मचारी उपस्थित होते.

# स्व. शशिकलाताई काकोडकर यांना त्यांच्या चतुर्थ पुण्यतिथी निमित्त तालुकावार श्रद्धांजली वाहण्यात आली



**डिचोली तालुका समिती :** अध्यक्ष – श्री. गुरुदास नाईक इतर पदाधिकारी समवेत केंद्रीय समिती सदस्य श्री. सुनिल पिळगांवकर.

**काणकोण तालुका समिती :** अध्यक्ष – श्री. रमाकांत बांदकर व इतर पदाधिकाऱ्यां समवेत केंद्रीय समिती सदस्य श्री. सतिश पैंगीणकर





**फोंडा तालुका समिती :** अध्यक्ष – श्री. रितेश नार्वेकर व केंद्रिय समिती अध्यक्ष – श्री. आनंद वाघुर्मेकर यांच्या उपस्थितीत इतर पदाधिकाऱ्यांसमवेत.

**केपें तालुका समिती :** अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत बाळ्ळीकर व इतर पदाधिकारी





**सालसेत तालुका समिती :**
अध्यक्ष – श्री. प्रमोद नाईक व इतर पदाधिकारी

**सांगें तालुका समिती :**
अध्यक्ष – श्री. गणपत देविदास व इतर पदाधिकारी





**सत्तरी तालुका समिती :**
अध्यक्ष – श्री. अशोक नाईक व इतर पदाधिकार

**तिसवाडी तालुका समिती :** अध्यक्ष – सौ. सुनिता पेडणेकर व इतर पदाधिकारी



# शैक्षणिक कर्ज वितरण...

गोमंतक मराठा समाज, हा समाज शिक्षणाच्या बळावरच आपले वर्चस्व गाजवू शकला. आपल्या समाजातील विद्यार्थी हा आर्थिक स्थितीमुळे उच्च शिक्षणाला वंचित राहू नये या दृष्टीने सन २००० पासून विना व्याज शैक्षणिक कर्ज योजना सुरू करण्यात आली. ज्याआधारे १४९ विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेऊन शिक्षण पूर्ण केले व समाजात आपले स्वतंत्र स्थान प्रस्थापित केले आहे.


लाभार्थींनी कर्जाची रक्कम परतफेड वेळोवेळी केल्याने सदर योजनेचा लाभ नवीन गरजू विद्यार्थ्यांना घेता येतो. तेव्हा आमची कर्ज घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांकडे एवढीच मागणी आहे की, आपली कर्जाची रक्कम ही वेळेत संस्थेकडे सुपूर्द करावी, त्यामुळे योजना पुढे चालवायला मदत होईल. तसेच आपल्या संस्थेतर्फे विद्यार्थी दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे. ज्याद्वारे समाजातील विद्यार्थ्यांची कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती बेताची असल्यास विद्यार्थ्याला दर महिना ५०० रु. संस्था शिक्षणासाठी मदत करते. तरी आमच्या या योजनेसही समाजातील बांधवानी आपला हातभार लावावा अशी अपेक्षा आहे.

आपला
अध्यक्ष,
गोमंतक मराठा समाज,
गोवा



**शैक्षणिक कर्ज २०२०-२३ वितरीत करताना केंद्रीय समिती : अध्यक्ष - श्री. आनंद घ. वाघुर्मेकर, सचिव - मंगेश कुंडईकर, समन्वयक - सतिश पैंगीणकर, अंतर्गत हिशेब तपासनीस - सुरेंद्र वळवईकर, तांत्रिक समिती सदस्य - नंदकिशोर शिरगांवकर व विद्यार्थी वर्ग.**

# समाजभूषण बाबन नाईक



आपल्या गोमंतक मराठा समाजाच्या संस्थात्मक उभारणीत आणि विशेषतः संस्थेची इमारत उभी करण्यात ज्यांनी अपूर्व असे योगदान दिले ते गोमंतक मराठा समाज, गोवाचे माजी अध्यक्ष व म. गो. पक्षाचे माजी आमदार बाबन नाईक यांच्या निधनाने एक सच्चा, निष्ठावंत समाज कार्यकर्ता हरपला आहे.

१९७२ ते १९७७ या कालावधीत बाबन नाईक हे पणजीचे आमदार होते. १९७५ मध्ये पणजी नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून सरकारने त्यांच्यावर जबाबदारी सोपविली. गोव्याचे भाग्यविधाते, पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर व त्यांच्या पश्चात श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या बरोबर राहून त्यांनी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षासाठी निष्ठेने कार्य केले. भाऊंच्या कारकीर्दीतील पारदर्शक सरकारमधील पारदर्शक आमदार, मंत्र्यांपैकी बाबन नाईक हे एक. निष्ठा आणि प्रतिष्ठा त्यांनी कायम सांभाळली. सरचिटणीस, कोषाध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष व पक्षाध्यक्ष अशा म. गो. पक्षाच्या पदांवर त्यांनी समर्पित वृत्तीने कार्य केले.

त्यावेळचे राजकारण व राजकारणी आणि आताचे राजकारण व राजकारणी यात जमीन अस्मानाचा फरक आहे. त्यावेळचे राजकारण हे समाजकारणासाठी होते. पदाची, मिळकतीची अपेक्षा न धरता निरपेक्षवृत्तीने आणि अत्यंत प्रामाणिकपणे बाबन नाईक यांच्यासारख्या आमदारांनी जनविकासासाठी योगदान दिले. या राजकारण्यांत स्वार्थाचा लवलेशही नव्हता. त्यांची आदर्शवत राजकीय कारकीर्द होती. जनकल्याणाचे व्रत या लोकांनी स्वीकारले होते. बाबन नाईक हे स्वतः उद्योजक होते, आमदार म्हणून निवडून आले परंतु नेहमीच विनयशीलवृत्तीने वावरले. समाजात आदराचे स्थान त्यांनी प्राप्त केले.

गोमंतक मराठा समाजाची स्वतःची अशी इमारत आज गोव्याच्या राजधानीत मध्यवर्ती ठिकाणी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या इमारतीचे कार्य १९७५ मध्ये

रखडले होते. संस्थेकडे केवळ ८४ रुपये शिल्लक होते अशावेळी बाबन नाईक यांच्यावर अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली आणि त्यांनी पुढाकार घेऊन या इमारतीसाठी इतरांच्या सहकार्याने निधी उभारला. इमारतीसाठी मागील समितीने घेतलेले कर्ज फेडून, इमारतीत महिला वसतिगृहासाठी अनुदान मिळवून इमारतीचे काम पुढे नेले. तिसऱ्या मजल्यासाठी स्मरणिकेद्वारे निधी उभारला व काही कर्ज घेऊन तिसऱ्या मजल्याचे व राजाराम पैंगिणकर स्मृती सभागृहाचे काम पूर्णत्वास नेले. इमारत बांधकामासाठी नारायण मराठे कारवारकर, बाबन नाईक, रत्नकांत म्हार्दोळकर, प्रमोद खांडेपारकर, सुरेंद्र काकोडकर, महेश नाईक, कमलिनी पैंगिणकर, वसंत पुतू नाईक यांनी निधी उभारण्यास कष्ट घेतले. 'स्मृतीसुगंध' हा दिवाळी अंक काढून जाहिरातींद्वारे काही निधी उभारला.

समाजाच्या कार्यकारिणीचा ताबा घ्यायला कोणी तयार नव्हते, इमारतीचे काम मार्गी लावायचे होते अशा वेळी नारायण कारवारकर मुंबईहून गोव्यात आले व त्यांनी बाबन नाईक, प्रमोद खांडेपारकर, रत्नकांत म्हार्दोळकर, सुरेंद्र काकोडकर, रमाकांत काकोडकर, महेश नाईक यांना बोलावून घेऊन कार्यकारिणीचा ताबा घ्यायला लावला. मग बाबन नाईक यांच्या अध्यक्षतेखाली या मंडळीने इमारतीच्या जमिनीचा कोर्ट कचेरीत असलेला प्रश्न सोडवला. स्मरणिका, दिवाळी अंक काढून जाहिरातींद्वारे निधी गोळा केला.

स्व. मोहन काकुलो यांनी बाबन नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांच्या शब्दाला मान देऊन 'क्रेडीट'वर इमारतीचे बांधकाम करून दिले व या कार्यकारिणीने नंतर ती रक्कम परत केली. गोमंतक मराठा समाजाचे मुखपत्र यांच्याच कारकीर्दीत सुरेंद्र काकोडकर यांनी सुरू केले व दहा वर्षे संपादनाची जबाबदारी सांभाळली. अशा प्रकारे बाबन नाईक यांचे नेतृत्व आपल्या समाजाला दिशादर्शक ठरले, समाज संस्थेची घडी बसवण्यात उपकारक ठरले.

बाबन नाईक यांनी आमदार म्हणून पणजी मतदार संघाचे पाच वर्षे नेतृत्व केले. परंतु पुन्हा ते विधानसभेच्या निवडणूकीत उतरले नाहीत. कारण राजकारणाकडे धंदा म्हणून त्यांनी कधी पाहिले नाही. शेवटपर्यंत म. गो. पक्षाशी ते एकनिष्ठ राहिले. दुसऱ्या पक्षाचा विचार त्यांनी कधीच केला नाही. मूल्यांशी तडजोड कधी केली नाही. आजचे बजबजपूरीचे, स्वार्थांध, भ्रष्ट राजकारण त्यांना मानवणारे नव्हते म्हणून ते सक्रीय राजकारणापासून गेली बरीच वर्षे दूरच राहिले होते. आपल्या गोमंतक मराठा समाजाला भूषणावह ठरलेल्या अशा व्यक्तिमत्त्वांचे निघून जाणे म्हणूनच वेदनादायी ठरते. त्यांच्या पवित्र स्मृतीस शतशः प्रणाम!

**– श्री. नितीन कोरगांवकर**

# भारत जांबावलीकर यांची 'एक्झीट' चटका लावणारी!



मित्राचा फोन आला मला म्हणाला, ''बातमी कळली का?'' मी म्हटलं, ''कुठली?'' ''भारतभाऊंना देवाज्ञा झाली.'' मी स्तब्ध झालो. डोळे पाणावले आणि दोन दिवसांपूर्वीची आठवण झाली.

भारतभाऊ म्हणजे भारत जांबावलीकर. आयुष्याच्या शेवटच्या उंबरठ्यावर होते. त्याच दिवशी त्यांना हॉस्पिटलमधून घरी आणले होते. डॉक्टरांनी जरी आशा सोडली होती तरी त्यांनी सोडली नव्हती. किंबहुना त्यांना आपल्या आजाराबद्दल काहीच माहीत नव्हते. मी विचारपूस करण्यासाठी त्यांच्या घरी गेलो आणि त्यांच्या सोबत बसलो. मला पाहून विषय त्यांनीच सुरू केला, ''कसा आहेस?'' मी म्हटलं, 'एकदम मस्त'. मग काही मिनिटे त्यांच्या प्रकृतिबद्दल बातचीत झाली आणि मग ते 'कोरोना'वर आले. 'मला तुझा अभिमान आहे' आमच्या गावाचं नाव रोशन केलंस.

'नाटक' आणि तेही संगीत नाटक हा भारत भाऊंचा आवडीचा विषय. माझ्या लहानपणापासून मी भारतभाऊंना खूप जवळून पाहत होतो. त्यांनी नाटकात जरी काम करायचे सोडले होते तरी पण त्यांची संगीत नाटकांवरील श्रद्धा तिळमात्रही कमी झाली नव्हती. एकटे असतानासुद्धा त्यांना कुठल्यातरी नाटकातली कुठलीतरी धुन गुणगुणायची सवय होती.

मी भारतभाऊंना भेटलो की फक्त आणि फक्त संगीत नाटक या विषयाबरोबर माझी राजकीय वाटचाल ह्यावर चर्चा व्हायची. त्यांचे माझ्यावर खूप प्रेम होते. त्यांचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे माझे नाट्य वेड. आमच्या बोलण्यात सदैव ते संगीत नाटकाची वकीली करत, तसे मला संगीत नाटकांबद्दल वैर नव्हते आणि नाही, पण मला माझी मर्यादा माहीत होती. मी चांगला गायक नाही. भारतभाऊ एक चांगले 'संगीत नट' होते. एका 'संगीत नटाला' शोभेल असे रूप आणि त्याबद्दलची आत्मियता हे त्यांना जन्मतः अवगत होते. ते सांगत की, त्यांच्या लहानपणी जांबावली म्हणजे 'श्री दामोदर तीर्थ

क्षेत्राबरोबर संगीत तिर्थक्षेत्र' होते. जांबावलीतील त्या संगीत वातावरणाचा भारतभाऊंवर एवढा परिणाम झाला होता की, ते त्यावेळी गौळणकाल्यात आपल्या गायन शैलीने लोकांना प्रभावित करायचे. त्यांचे नाटक पाहण्याकरिता लोक गर्दी करायचे. संगीत नाटकांत त्यांनी स्वतःचे असे वलय निर्माण केले होते. 'संगीत शारदा', 'ययाती देवयानी', 'शाकुंतल', 'संगीत संशय कल्लोळ' अशा अनेक नाटकांत त्यांनी गायक नटाची भूमिका साकारली होती.

एकदा विष्णु सूर्या वाघांनी भारतभाऊंना सांगितले की, भावेश हा माझा शिष्य आहे. तेव्हा तर ते एवढे खुष झाले की, त्यांनी हे सर्व लोकांना जाहीरपणे सांगितले.

कलाकार आयुष्यात दोन कामे करतो, एक कलेची सेवा आणि आपल्या सारख्या दुसऱ्या एका कलाकाराचा शोध. जांबावलीला होणाऱ्या शिशिरोत्सव, कार्तिकी पौर्णिमोत्सव आणि पिंडीकोत्सवातील संगीत नाटकांचा ते नेहमी आस्वाद घेत असत. एखादे पात्र आवडले की, नाटक संपल्यावर वा दुसऱ्या दिवशी त्यांना भेटून त्याचे कौतुक केल्याशिवाय ते कधीच राहत नसत. कलाकाराला नेमके काय हवे हे त्यांना अचूक माहीत होते आणि म्हणूनच ते महान होते. मी साकारलेल्या प्रत्येक भुमिकेबद्दल माझे आणि त्यांचे नेहमी संभाषण व्हायचे. जे चांगले ते चांगले असा त्यांचा नाटकाच्या बाबतीत सरळ म्हणणे होते. कलाकारांना वयाची मर्यादा नसते. मी आणि भारतभाऊ त्याचे उदाहरण होतो. कुठे पण कधीपण आम्ही नाटकावर बिनधास्तपणे बोलायचो. मी भारतभाऊंना दोन लहान (एका प्रवेशाची) भूमिका करताना बघितले होते. त्यातले एक होते 'झोपा आता गुपचुप'. भारतभाऊ खूप वर्षानी नाटकात काम करणार होते. नाटक संगीत नव्हते तरी त्यांनी ही भूमिका का घेतली हा विचार माझ्या मनात होता. नंतर समजले की, ही भूमिका 'शिवाजी महाराजांची' आहे. भारत भाऊंच्या ह्या भूमिकेबद्दल सर्वांना कुतुहल होते. भरजरीत महाराजांच्या वेषाने त्यांची टाळ्यांनी ऍण्ट्री झाली आणि त्यांचा एकमेव डायलॉग बोलून ते गेले. नाटकाचा प्रयोग एकदम फसला होता, पण मंडपातून लोक हलले नव्हते. 'कारण त्यांना भारत भाऊंचा रोल' बघायचा होता. त्या प्रयोगात त्यांची भाषेवरची पकड अभिनयातील सहजता माझ्या मनाला कुठेतरी स्पर्श करून गेली. ते १९९४-९५ चे साल असावे. त्यानंतर भारतभाऊ २००० मध्ये छोट्याशा भुमिकेद्वारे परत एकदा स्टेजवर आले. काही असे कलाकार असतात जे प्रसिद्ध नसतात पण त्यांनी प्रेक्षकांच्या मनात एक घर केलेले असते. जेव्हा ते स्टेजवर एंट्री करतात तेव्हा ते त्यांच्या ह्रदयात थेट प्रवेश करतात.

मी तेव्हाच ठरविले होते की, मी भारतभाऊंबरोबर एक दिवस नाटकांत काम करणार आणि हे स्वप्न २०१४ मध्ये पूर्ण झाले. नाटक होते 'संगीत सौभद्र'. मी बलराम आणि भारतभाऊ 'नारद'. तालमीच्या दरम्यान आमची कलाकाररूपी दोस्ती अजून 'गहरी' झाली. त्यावेळी भारतभाऊंचे वय होते ६८. नाटकाच्या दिवशी सकाळी भारतभाऊ आणि मेकअपमॅन बरोबर चर्चा करत होते. मी ऐकत होतो. भारतभाऊ त्या नारदाच्या भूमिकेत एवढे गुंतले होते की, ते त्यांना सांगत होते की, स्पिरिट गम लावल्यावर गायकाला किती त्रास होतो. 'तरी बरे झाले नारदाला मिशा नाहीत' असं ते विनोदाने म्हणाले होते. त्यांनी

विषय संपवला आणि माझ्याशी सेट बद्दल बोलू लागले. एक उत्सवी कलाकार ज्यांची आपल्या नाटकाबद्दल किती ओढ असते हे मला त्या दिवशी समजले.

नाटक सुरू झाल्यापासून संपेपर्यंत ते नारद होते. त्यानंतर 'नरसिंह अवतार' आणि २०१७ मध्ये 'इथे ओशाळला मृत्यु' अशी दोन नाटके त्यांच्या सोबत करण्याची संधी लाभली. गायन हा त्यांचा आवडीचा विषय होता. भजन, वगैरे ते गायचे. गाण्याचा कार्यक्रम असेल आणि त्यात भारतभाऊंना गाण्याची फरमाईश नसेल असे कधीच होत नसे.

ते मला म्हणाले, ''आता बरं वाटतंय माझ्या पायाची सूज कमी झाली आहे. ह्या वर्षी आम्ही 'सं. मत्स्यगंधा' नाटक करूया.'' मी म्हटलं ''माझ्याकडे पुस्तक आहे. आपण नक्की करूया.'' बोलता बोलता तासभर कसा निघून गेला हे समजलेच नाही. मी त्यांना आराम करण्यासाठी सांगितले आणि मी घरी आलो.

आणि मित्राचा तो फोन हृदयाला चटका लावून गेला. 'सं. मत्स्यगंधा' नाटक आम्ही करणार यात शंका नाही. पण अमर देवव्रताने (भारत जांबावलीकर) एंट्री घेण्यापूर्वीच या जीवनाच्या रंगमंचावरून 'एक्झीट' घेतली आहे. देव दामोदर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो ही प्रार्थना!

* गोमंतक मराठा समाजातर्फे भारत जांबावलीकरांचा उत्कृष्ट नाट्य कलाकार पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.
* गोवा राज्याचा कलासन्मान पुरस्कार त्यांना प्राप्त झालेला आहे.

**मत्स्यगंधातले हे पद्य भारत जांबावलीकरांना समर्पित...**

गुंतता हृदय हे
कमलदलाच्या पाशी
हा पणयगंध परिमळे
तुझ्या अंगाशी

या इथे जाहला संगम दो सरितांचा
प्राकनी आपल्या योग
तिथे प्रीतीचा
अद्‌वैत आपुले घडता या
तिर्थाशी

दुर्दैव आपण दुरावलो
या देही
सहवास संपता डागळले ज्ञण
तेही
स्मर एकच तेव्हा सखये
निज हृदयाशी



**– श्री. भावेश जांबावलीकर**
जांबावली, केपें–गोवा

# उत्तर कर्नाटकातील गोमंतक मराठा समाज

'देवळां थंय देवळी' अशी कारवार परीसरात गोमंतक मराठा समाजाविषयी म्हण प्रचलित आहे. तरी सध्या तेवढी वापरात नाही. कालांतराने कारवारात शिक्षणाची प्रगती झाली तरी माझ्या समाजाकडे पाहण्याची नजर म्हणावी तेवढी बदललेली नाही आहे. त्यांची झळ अजूनही बसत आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे. तसा अनुभव मी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या अजूनही घेत आहे. माझे मूळ घराणे सदाशिवगड गांवातले अशी माझी आजी म्हणत होती ती आठवण आहे. माझे वडील गोवा स्वतंत्र झाल्यानंतर गोव्यात कामासाठी आले ते सेवानिवृत्त होईपर्यंत गोव्यातच होते. मीही बारावी पर्यंत गोव्यात शिकलो अन् पुढील शिक्षणासाठी कारवारला आलो अन् गोवेकराचा कारवारकर झालो.

इथे कॉलेजमध्ये पाऊल ठेवले अन् एक वेगळेपणाचा अनुभव येऊन लागला. ओळख झाली. जी ती मुलें आधी आडनांव विचारत होती का विचारत होती ते त्या वेळी समजलें नाही. आत्याला विचारले तरी समर्पक उत्तर मिळाले नाही. त्या वेळी स्मार्टमोबाईल पण नव्हता. तेव्हा कोंकणीतील ज्येष्ठ लोकवेद संशोधिका श्रीमती जयंती नाहईक यांचे 'आमोणे - एक लोकजीण' हे पुस्तक हातात पडले आणि माझ्या समाजाचा पूर्ण इतिहास माहीत झाला. तेव्हा समजले कीं, मुले आडनांव का विचारतात. तसे आता सुद्धा या बाबतीत काहीही सुधारणा झालेली नाही.

कारवार तालुका आणि सुपा तालुका (आताचा जोयडा तालुका) गोव्याला जोडूनच आहेत. कधी काळी हे भाग मुंबई प्रांताचे भाग होते. पोर्तुगीजांनी घेतलेला भागच गोवा नाही, तर गंगावळी नदी पर्यंतचा भाग हा गोव्यात येत होता. पण कालांतराने हा भाग ब्रिटीश आणि भारत स्वतंत्र झाल्यानंतर कर्नाटकात गेला. तरी इथली जनता ही मूळची इथलीच अन् ती गोव्यातून आलेली नाही हे स्पष्ट होते. इथली भाषा, लोक संस्कृती, लोकवेद, राहणीमान, रोटी बेटी व्यवहार प्रामुख्याने गोव्याशी जास्त जवळचा आहे. आताच्या काळात कन्नडचे वर्चस्व दाखवण्यासाठी इथले राजकारणी लोक सर्व समाजामध्ये गैरसमज निर्माण करतात. तिथे माझ्या समाजातलें राजकारणी तेही काही मागे नाहीत. हे इथे खेदाने नमूद करावे लागते.

गोमंतक मराठा समाज कारवार, जोयडा, अंकोला तालुक्यात जास्त प्रमाणात तर कुमठा, होन्नावर, भटकळ, शिरशी, यल्लापुर, हल्याळ या तालुक्यात थोडा कमी प्रमाणात आढळतो. तरी कर्नाटकात इथलेच समाज बांधव पोटापाण्यासाठी इतर जिल्ह्यात पण आहेत. कारवारच्या गोमंतक मराठा समाजात चार पोटजातीचा

प्रामुख्याने उल्लेख केला जातो. बांदी, देवळी, कलवंत, गुरव. तरी वाजंत्री समाज हा गोमंतक मराठा समाजाचा भाऊबंदकीतला तरी इथे तो वेगळा समाज मानला जातो.

ह्या समाजातल्या पोटजातीतला 'बांदी' ह्या पोटजातीतले लोक देवळी, कलवंत, गुरव, ह्या पेक्षा उच्च कुळातलें असे मानतात. कारण बांदीचा देवळाशी काही संबंध नाही आणि यांचा संबंध भट आणि ब्राह्मण यांच्या घराण्याकडे संबंध असल्यामुळे आपण तुमच्या पेक्षा जातीने उच्च मानता. गेल्या विसेक वर्षामागे सुद्धा बांदी समाजातले लोक देवळी, कलवंत, गुरव यांच्याशी लग्न संबंध करत नव्हते. आता रोटीबेटी व्यवहार होतो.

गोव्यात देवदासी प्रथा बंद होऊन बराच काळ लोटला तरी इथे २०१५ पर्यंत देवदासी देवळाच्या प्राकारात नाच करत होती. २०१५ नंतर सर्व बंद झाले तरी मंदिरातल्या सेवे बरोबर चंवर घालण्याचे काम अजूनही चालू आहे. फरक एवढाच की, पूर्वी 'नाल्लपड' मिळायची आता पगार मिळतो, कारण आता मोठमोठी देवस्थाने सरकारने ताब्यात घेतली आहेत. काही लोकांनी परवडत नाही किंवा पोटापाण्यासाठी स्थलांतर केले त्यांनी सेवा सोडली.

कर्नाटक राज्यात १९७२ च्या आसपास 'बांदी' ही जात अनुसूचित जाती जमातीत येत होती. पुढे कर्नाटकातल्या अल्पसंतुष्ट म्हणा किंवा राजकीय आकसापोटी 'बांदी' ला सामान्य वर्गात वर्ग केले अन् त्या विषयीचा दावा निकालात काढला नाही. याचे एक कारण त्या दोन्ही राजकारणी व्यक्ती देवळी पोटजातीतले होते. देवळी, गुरव, कलावंत ह्या पोटजाती इतर मागासवर्गीय म्हणून कर्नाटकात नोंद आहेत.

कारवार आणि उत्तर कन्नड जिल्ह्यात प्रामुख्याने बांदेकर, बाडकर. अंकोलेकर, नार्वेकर, चेंडेकर, अवर्सेकर, गडकर, लोलयेंकर, इडूरकर, केरवडीकर, हळगेकर, काणकोणकर, हनमट्टेकर, नायक, देवळी, बांदी, गुरव अस्नोटकर, नाईक आणि इतर आडनावाचे बांधव आहेत. तरी जे मुंबईत त्या काळी जाऊन जे स्थायिक झाले त्यांनी चक्क गौड सारस्वत ब्राह्मणांची आडनांवे लावली जसें साखरदांडेकर हे आडनांव.

माझ्या असे ऐकीवात आले होते, की आपल्या गोव्यातील 'गोमंतक मराठा समाज' या शिखर संस्थेने कारवार मध्ये जी पोटशाखेतली दूरी आहे ती दूरी दूर करण्यासाठी एकसंध गोमंतक मराठा समाज समाजोन्नती संघ या नांवाने बांदी लोकांची संस्था, तर देवळी, गुरव, कलवंत यांची मुंबईत जन्माला आलेली कारवार मराठी उत्कर्ष मंडळ या संस्था कार्यरत केल्या. अंकोला, यल्लापूर, शिरशी, दांडेली येथे 'गोमंतक समाज' यानांवाने तर हुबळी-धारवाड येथे 'कोंकण सारस्वत समाज' या

नांवाने कार्यरत आहे. ह्या सर्व संस्थेचा वर्षात एकदाच कार्यक्रम असतो.

गोमंतक मराठा समाजातल्या लोकांनी कर्नाटकाच्या राजकारणात ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा पंचायत, विधानसभा, विधान परीषदेपर्यंत मजल मारली आहे ही आनंदीची बाब असली तरी समाजाचे वार्षिक कार्यक्रम कन्नड मध्ये होतात ही खेदाची बाब आहे, कारण आपल्या समाजाची भाषा मूळात कोंकणी, मराठी आहे हे राजकारणात आल्यानंतर विसरतात.

कारवारच्या गोमंतक मराठा समाजाने शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. आज कारवार सरस्वती विद्यालय ही शाळा साठच्या दशकांतली मराठी शाळा पण आज ती पूर्ण कन्नड झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रात स्व. दत्तू बांदेकर यांचे नाव अजूनही इतकी वर्षे उलटली तरी आवर्जून घेतले जाते. नाट्य क्षेत्रांत स्व. जयश्री शेजवाडकर यांचे नांव अजरामर आहे. चित्रपट क्षेत्रात स्व. जयश्री गडकर, सगुण बोरकर, स्नेहलता गडकर यांचे नांव, तर भारतीय नौसेनेत मनोज बाडकर यांचे नांव आहे. आज कारवारची रंगभूमी शेवटची घटका मोजत असली तरी एके काळी आमच्या समाजातल्या भगिनी अग्रेसर होत्या. मराठी शाळा बंद, कन्नड सक्ती, रोजगाराची व्यवस्था नाही तेव्हा इतर समजाबरोबर आमचा समाजही पर राज्यात गेला. आज कारवार अन् जोयडा भागात मराठी नाटकांनंतर कोंकणी नाटकांची चलती आहे. पूर्वी प्रमाणे स्त्रियांनी नाटकात काम करणे हे अजूनही कमी पणाचे मानतात. आज गोमंतक मराठा समाजातर्फे काही पुरुष मंडळी कोंकणी नाटकांत स्त्री पात्र करतात.

असा हा कारवारचा गोमंतक मराठा समाज अजूनपर्यंत गोव्यातल्या प्रथम संस्थेप्रमाणे एकसंध न होता आपापल्या बांधवाशी वेगळे राहून आपलें अस्तित्व टिकवण्यासठी धडपडत आहे. आपली मराठी भाषा हरवून बसला तरी कोंकणी भाषा तोंडी सांभाळून तर कन्नड भाषा शिकून राहिला आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, कला आणि इतर बाबतीत तरबेज असला तरी कारवार भागात हा समाज अजूनही मागास आहे.

**– श्री. संदेश श्रीकांत बांदेकर**



सदाशिवगड

कारवार – ५८१३५२

९४८०७९०१७२

# तालुकास्तरीय विविध कार्यक्रम

## काणकोण तालुका : रांगोळी स्पर्धा



**परिक्षकां समवेत काणकोण तालुक्यातील पदाधिकारी.**

गोमंतक मराठा समाज काणकोण शाखा व महिला समितीतर्फे घेतलेल्या रांगोळी व पाककला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नुकताच झाला. नगर्से-काणकोण येथील दत्त मंदिर सभागृहात झालेल्या या समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून गोमंतक मराठा समाज गोवा कार्यकारिणीच्या सदस्या ॲड. हर्षा नाईक, सहसचिव सतीश पैंगीणकर, दीपमाला काळे, काणकोण शाखा अध्यक्ष रमाकांत बांदेकर, महिला समिती अध्यक्ष सुरेखा बांदेकर, सचिव वसंत देवीदास उपस्थित होते.

काणकोण तालुक्यातील समाज बंधू-भगिनींनी पणजी येथील संस्था सभागृहात ७ रोजीच्या शशिकला काकोडकर यांच्या जयंतीदिनी आयोजिलेल्या मातृमेळावा कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. हर्षा नाईक यांनी केले. दीपमाला काळे यांनी 'करिअर गाईडन्स' या विषयावर भाष्य केले. सतीश पैंगीणकर यांनी तालुक्यातील आजपर्यंतच्या उपक्रमांची माहिती दिली. रांगोळी स्पर्धेतील विजेत्या प्राप्ती खोलकर, श्रुती बांदेकर व सुषमा मुडकुडकर यांना अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे बक्षीस देण्यात आले. पृथा देळेकर, समीक्षा फातर्पेकर, साईश्वरी बांदेकर, प्रणाली नाईक व स्वरांगी नाईक यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमस्थानी घेतलेल्या पाककला स्पर्धेत अंकिता नाईक, योगिनी बांदेकर, आरती काणकोणकर यांना अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे बक्षीस प्राप्त झाले. पूजा नाईक, मीना लोलयेकर, हेमा संतोष नाईक, मनीषा खोलकर व विजिता काणकोणकर यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. रांगोळी स्पर्धेसाठी अनीशा पैंगीणकर, प्रियांदा नाईक व सुरेखा बांदेकर यांनी व पाककला स्पर्धेसाठी कौशिकी गायक व जया बांदेकर यांनी परीक्षण केले.

ॲड. हर्षा नाईक, सतीश पैंगीणकर व दीपमाला काळे यांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेखा बांदेकर व रमकांत बांदेकर यांनी मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. आदिती खोलकर, श्रुती बांदेकर, आर्या बांदेकर, समीक्षा फातर्पेकर व आलिशा बांदेकर यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ प्रदान केले. सूत्रसंचालन हरिश्चंद्र खोलकर यांनी केले. विद्या गायक यांनी आभार मानले.

## पेडणे तालुका : रांगोळी व पणती आरास स्पर्धा

गोमंतक मराठा समाज पेडणे तालुका समितीतर्फे दीपावलीनिमित्त तालुक्यातील समाजबांधव, भगिनींकरिता तालुक्याच्या युवा समिती व महिला समितीतर्फे रांगोळी स्पर्धा व पणती आरास स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला तालुक्यातील समाजबांधव, भगिनीनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन्ही स्पर्धात एकूण ४३ स्पर्धक सहभागी झाले.

स्पर्धाचा निकाल : **रांगोळी स्पर्धा** : प्रथम – तनया तोरस्कर, दि्वतीय – कनक पालयेकर, तृतीय – रुपाली पार्सेकर, उत्तेजनार्थ – अनुक्रमे अनया तोरस्कर, मृण्मयी मांद्रेकर, दीपा नाईक यांना बक्षिसे प्राप्त झाली.

**पणती आरास स्पर्धा** : प्रथम – शीतल मालपेकर, दि्पतीय ऐश्वर्या मालपेकर, तृतीय – हेमा पार्सेकर, उत्तेजनार्थ अनुक्रमे – प्रिती मोरजकर, मृण्मयी मांद्रेकर व प्रियांका पार्सेकर यांना बक्षिसे प्राप्त झाली.

दोन्ही स्पर्धाचे परीक्षण चित्रकार कलाशिक्षक शंकर म्हामल यांनी केले. स्पर्धाप्रमुख विशांत मांद्रेकर, मिलन कामुलकर यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सर्व विजेत्यांचे अभिनंदन तालुकाध्यक्ष लक्ष्मण मोरजकर यांनी केले.

## मुरगांव तालुका : आकाशकंदील स्पर्धा




**आकाशकंदील स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांसमवेत मुरगांव तालुका समिती पदाधिकारी.**

गोमंतक मराठा समाज मुरगाव शाखा आयोजित ज्ञाती भगिनी मर्यादित आकाश कंदिल स्पर्धा संपन्न झाली. याप्रसंगी व्यासपीठावर समितीचे अध्यक्ष कृष्णा तोरस्कर (भोबे), उपाध्यक्ष प्रमोद देविदास तसेच परीक्षक दीपक काणकोणकर, परिक्षक मिलिंद काकोडकर उपस्थित होते. स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे : पहिले बक्षिस – अथर्व नायक, दुसरे बक्षिस – पुनम देविदास आणि तिसरे बक्षिस – श्रेया तोरस्कर यांना प्राप्त झाले. या स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांना प्रशस्तिपत्रके देण्यात आली. सुरूवातील समितीचे अध्यक्ष कृष्णा तोरस्कर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपाध्यक्ष प्रमोद देविदास यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सुनील नाईक यांनी केले.

# फोंडा तालुका : विविध स्पर्धा

**१) ऑनलाईन आकाशकंदील स्पर्धा :**

गोमंतक मराठा समाज, फोंडा तालुका समितीतर्फे फोंडा तालुका मर्यादित समाज बांधवासाठी ऑनलाईन आकाशकंदील स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे परीक्षण श्री. रामानंद फडते व सोनाली प्रभू यांनी कले.

स्पर्धेतील विजेते : प्रथम – हर्ष वेलिंगकर, वेलिंग, द्वितीय – विश्वा बोरकर, फोंडा, तृतीय – विराज आगलोटकर, कवळे.

**२) रांगोळी स्पर्धा :**

गोमंतक मराठा समाज फोंडा तालुका समितीने, ऑनलाईन रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती. त्याचा निकाल खालील प्रमाणे :

प्रथम – गौरी आगलोटकर, सिमेपायण, मंगेशी, द्वितीय – जानकी शिवाजी नाईक, तृतीय – दिया नारायण नाईक, खांडोळा, माशेल

**३) पताका स्पर्धा :**

समाजाच्या फोंडा तालुका समितीने, ऑनलाईन पताका स्पर्धा आयोजित केली होती. त्याचा निकाल खालील प्रमाणे :

प्रथम – योगेश कुर्डीकर, द्वितीय – कुशाल सांकळेकर, तृतीय – प्रज्वल प्रदीप वळवईकर

सदर स्पर्धेच्या बक्षिस वितरणाला केंद्रीय समितीचे पदाधिकारी सचिव श्री. मंगेश कुंडईकर, तसेच फोंडा तालुका पुरुष व महिला समिती पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.






**बक्षिस वितरण सोहळ्यात केंद्रीय समितीचे सचिव श्री. मंगेश कुंडईकर, अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. सुरेंद्र वळवईकर व फोंडा तालुका समितीचे अध्यक्ष श्री. रितेश नार्वेकर.**

## ४) चित्रकला व निबंध लेखन स्पर्धा



**गोमंतक मराठा समाज फोंडा शाखेतर्फे आयोजित ज्ञाती विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सदर स्पर्धेत सहभागी स्पर्धकांसह परीक्षक व समितीचे सदस्य.**




**गोमंतक मराठा समाज फोंडा शाखेतर्फे आयोजित ज्ञाती विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी काढलेली चित्रे.**

गोमंतक मराठा समाज, फोंडा तालुका महिला समितीतर्फे बालदिनानिमित्त लहान मुलांसाठी चित्रकला व निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. किरण फातर्पेकर तसेच केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री. आनंद वाघुर्मेकर उपस्थित होते. तसेच फोंडा तालुका पुरुष समिती तथा महिला समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. श्री. फातर्पेकर यांनी मुलांना उद्‌बोधक गोष्टी सांगितल्या. तर अध्यक्षांनी महिला समितीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल महिला समितीचे अभिनंदन केले. स्वागत सौ. ज्योती रामराव नागेशकर यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय सौ. शैला कवळेकर यांनी करून दिला. सौ. वरदा वेरेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# डिचोली तालुका : विविध स्पर्धाचे आयोजन

## १) महिलांसाठी पाककला स्पर्धा





**बक्षिस वितरण सोहळ्यात केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री. आनंद वाघुर्मेकर, सचिव श्री. मंगेश कुंडईकर, सदस्य श्री. जितेंद्र शिरगांवकर व ता. समितीचे अध्यक्ष श्री. गुरुदास नाईक, खजिनदार मधु नाईक सचिव सागर विर्डीकर व इतर पदाधिकाऱ्यां समवेत.**

डिचोली तालुका समिती व युवा समितीच्या संयुक्त विद्यमानाने महिलांसाठी पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली. सदर पाककला स्पर्धा सावंत हॉल कारापूर तिस्क येथे घेण्यात आली. यावेळी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री. आनंद वाघुर्मेकर, सचिव : श्री. मंगेश कुंडईकर, सदस्य : श्री. जितेंद्र शिरगांवकर व डिचोली तालुका समिती पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे :

पहिले : क्रीती तिवरेकर, दुसरे : चंदन न्हावेलकर, तिसरे : मनिशा शिरगांवकर, चौथे : अनुजा कारापूरकर, पाचवे : अनुष्का वेरणेकर, सहावे : रश्मा न्हावेलकर, सातवे : भाग्यश्री कारापूरकर, आठवे : शुभांगी शिरगावकर, नववे : भारती शिरगावकर, दहावे : जयश्री नाईक, अकरावे : रुपश्री कवळेकर, बारावे : प्राप्ती न्हावेलकर, तेरावे : विनंती नाईक

## २) ऑनलाईन नवरात्र नवरंग स्पर्धा

डिचोली तालुका समिती व युवा समितीच्या संयुक्त विद्यमान ऑनलाईन पद्धतीने नवरात्र नंवरंग स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली. स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे :

प्रथम : विनंती नाईक, उत्तेजनार्थ : द्वितीय : अपूर्वा नावेलकर, प्रथम : रिश्वा नावेलकर, तृतीय : इश्वानी नाईक, द्वितीय : सुमेधा विर्डीकर, चौथी : अनुष्का वेर्णेकर, तृतीय : आराधना वायंगणकर, पाचवी : मिताली नाईक

त्याचबरोबर महिलांनी उत्स्फूर्तपणे ऑन दी स्पॉट खेळांद्वारे करमणूक केली. बक्षिस पात्र महिला पुढील प्रमाणे :

मॅचिंग : अपूर्वा नाईक, बँगल्स : विनंती नाईक, छायाचित्र : अनुक्षा वेर्णेकर, उखाणे : भारती शिरगावकर, फस्ट कॉल : सेजल नाईक संगीत खुर्ची : जयश्री नाईक

## ३) जेष्ठ समाज बांधवांना दिवाळी फराळ भेट देण्याचा कार्यक्रम





गोमंतक मराठा समाज, डिचोली तालुका समितीतर्फे, सत्तर वर्षावरील ज्येष्ठांच्या घरी जाऊन त्यांना सन्मानित केले व दिवाळीच्या फराळाची भेट दिली. सदर कार्यक्रम डिचोली तालुक्यातील पंचायत स्तरावर करण्यात आला. यावेळी डिचोली तालुका समिती पदाधिकारी व समाज बांधव तसेच केंद्रीय समिती सदस्य श्री. जितेंद्र शिरगांवकर व श्री. राजन कडकडे उपस्थित होते.

# तिसवाडी तालुका : विविध कार्यक्रमांचे आयोजन

## १) स्व. गजानन आमोणकर यांच्या स्मरणार्थ तबला स्पर्धा







गोमंतक मराठा समाजाच्या तिसवाडी तालुका समितीतर्फे प्रसिद्ध तबला तथा पखवाजवादक स्व. गजानन आमोणकर यांच्या स्मरणार्थ पंधरा वर्षाखालील स्पर्धकांसाठी तबलावादन स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात पं. कमलाकर नाईक प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर समाजाच्या केंद्रीय समितीचे माजी अध्यक्ष उमेश नाईक, तिसवाडी समितीचे सल्लागार भालचंद्र आमोणकर, समितीच्या अध्यक्ष सुनीता पेडणेकर, केंद्रीय समितीच्या सदस्य ॲड. हर्षा नाईक व सौ. उत्कर्षा बाणस्तारकर, परीक्षक पं. उल्हास वेलिंगकर व नितीन कोरगावकर, स्पर्धेचे समन्वयक गोरख मांद्रेकर व गजानन आमोणकर यांचे बंधू शशिकांत आमोणकर (माजी नगरसेवक) आदी मान्यवर उपस्थित होते. सुनीता पेडणेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ॲड. हर्षा नाईक, उमेश नाईक, अजित कांबळी यांनी आपले विचार मांडले. परीक्षकांच्यावतीने नितीन कोरगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. तिसवाडी समितीच्या कोषाध्यक्ष श्रद्धा नाईक, सौ. सिमरन काकोडकर यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. रोहिदास नाईक यानी सूत्रसंचालन केले तर सचिव प्रशांत माशेलकर यांनी आभार मानले.

## २) दिपोत्सव आणि रांगोळी स्पर्धा



**गोमंतक मराठा समाज तिसवाडी शाखा आयोजित दिपोत्सव आणि रांगोळी स्पर्धेत विजयी स्पर्धेकांसमवेत परिक्षक व समितीचे सदस्य.**

तिसवाडी तालुका समितीतर्फे दि. २८ नोव्हेंबर २०२० रोजी संध्याकाळी ठिक ४.३० वाजता मराठा समाज सभागृहातील भोजन कक्षात फुलांच्या पाकळ्यांची रांगोळी आणि पणत्यांची सजावट अशी स्पर्धा दिपोत्सवानिमित्त आयोजित केली होती. या स्पर्धेत १० महिलांनी भाग घेतला होता. ही स्पर्धा तिसवाडी तालुक्यातील समाज भगिनींसाठी मर्यादित होती. रांगोळीसाठी एक तासाचा अवधी प्रत्येक स्पर्धकाला दिला होता. परिक्षक म्हणून कला शिक्षक श्री. नागेश सरदेसाई व आर्ट डिझाईन व फोटग्राफर श्री. कमाल शेख अशा दोन मान्यवरांना आमंत्रित केले होते. निकालानंतर पहिल्या पांच विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू व प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले आणि राहिलेल्या पांच रांगोळी स्पर्धकांना त्यांनी स्पर्धेत भाग घेतल्याबद्दल प्रशस्तीपत्र तसेच भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. श्री. रोहिदास नाईक सल्लागार व कार्यक्रम संयोजक यांनी सभागृहातील सर्व स्पर्धकांचे, मान्यवरांचे तसेच समाज भगिनींचे स्वागत केले. अध्यक्षा सौ. सुनीता पेडणेकर यांनी परीक्षकांची ओळख करून दिली. शेवटी सचिव श्री. प्रशांत माशेलकर यांनी आभार व्यक्त केले.

## धारबांदोडा तालुका : पाककला स्पर्धा



**गोमंतक मराठा समाज धारबांदोडा शाखा आयोजित ज्ञाती भगिनींसाठी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सदर स्पर्धेत सहभागी स्पर्धकांसह परीक्षक व समितीचे सदस्य.**

# बार्देश तालुका : पारंपारिक आकाशकंदील स्पर्धा



**आकाशकंदील स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धाकांसह परिक्षक व संस्थेचे मान्यवर.**

बार्देश तालुका समिती अध्यक्ष श्री. दुर्गेश वेरेंकर यांनी आकाशकंदिल स्पर्धेसाठी आमंत्रित मान्यवर व उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरवात केली. यावेळी सांगोल्डाचे सरपंच श्री. अविनाश नाईक, सुकूर सरपंच श्री. संदीप वझरकर, हडफडे - नागोवाचे सरपंच श्री. राजेश मोरस्कर, स्पर्धेचे परिक्षक श्री. नारायण राठवड व श्री. राजेंद्र नार्वेकर, देव बोडगेश्वर संस्थान सचिव श्री. अशोक गोवेकर, खजिनदार - शामसुंदर पेडणेकर, ॲटॉर्नी श्री. नंदकिशोर शिरगांवकर, तालुका समिती सल्लागार श्री. गोरख मांद्रेकर, केंद्रीय समितीचे खजिनादर श्रीकृष्ण आस्कांवकर उपस्थित होते. मान्यवरांनी स्पर्धक व उपस्थित सदस्यांना मार्गदर्शनपर विचार मांडले त्यानंतर बक्षिस वितरण करण्यात आले.

**आकाश कंदिल स्पर्धा निकाल** : प्रथम - देवदत्त स. नार्वेकर, द्वितीय - शामली नाईक, तृतीय - भक्ती स. नार्वेकर, प्रथम उत्तेजनार्थ - सोनल नाईक, द्वितीय उत्तेजनर्थ - साक्षी नरसुले, तृतीय उत्तेजनार्थ - सात्वीका नादोडकर, विशेष पारितोषिक - संगिता नाईक


## MULTI TASKING STAFF पाहिजे

गोमंतक मराठा समाज, गोवातर्फे समाजाच्या पणजी येथील
कार्यालयासाठी Multi tasking Staff (MTS) पदावर कर्मचारी पाहिजे.
शैक्षणिक पात्रता - किमान दहावी उत्तीर्ण.
इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज दि. २५ फेब्रुवारी २०२१ पर्यंत
खालील पत्त्यावर पाठवावा.
अध्यक्ष
गोमंतक मराठा समाज
दयानंद स्मृती, स्वामी विवेकानंद मार्ग, पणजी, गोवा - ४०३ ००१
दूरध्वनी - ०८३२-२२२६०९९

# बार्देश तालुका समिती २०२०–२३



| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. दुर्गेश वेरेकर |
| उपाध्यक्ष | : | श्री. समीर मु. नार्वेकर |
| सचिव | : | श्री. प्रसाद पार्सेकर |
| खजिनदार | : | श्री. रघुनाथ मांद्रेकर |
| सदस्य | : | श्री. लक्ष्मीकांत नाईक म्हापसेकर |
| | | श्री. अक्षय पेडणेकर |
| | | श्री. गिरीश नाईक मार्शेलकर |
| | | श्री. चंद्रकांत आसगांवकर |
| | | सौ. शरयू कोलवाळकर |
| | | सौ. साक्षी नांदोडकर |
| | | सौ. पूजा नाईक |
| | | श्री. सर्वेश नाईक |
| सल्लागार | : | श्री. गोरख मांद्रेकर |
| | | ॲड. वामन पंडीत |
| | | श्री. अविनाश शिंदे |
| | | श्री. उमाकांत धारगळकर |

# बार्देश तालुका महिला समिती २०२०-२३



| | | |
|---|---|---|
| अध्यक्षा | : | सौ. मानसी आसगांवकर |
| उपाध्यक्षा | : | श्रीमती सुफला मांद्रेकर |
| सचिव | : | सौ. स्मिता शिरगांवकर |
| सहसचिव | : | सौ. इंदिरा नाईक |
| खजिनदार | : | सौ. पुजा आराबेकर |
| सदस्या | : | सौ. सुषमा नाईक |
| | | सौ. वासंती नाईक |
| | | सौ. लक्ष्मी नार्वेकर |
| | | सौ. तेजा नाईक |

# बार्देश तालुका – युवा समिती २०२०-२३




| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | कु. रुषभ नाईक माशेलकर |
| उपाध्यक्ष | : | कु. दिप्ती कोलवाळकर |
| सचिव | : | कु. श्रृती आराबेकर |
| सहसचिव | : | कु. वरुण नाईक |
| खजिनदार | : | कु. केतकी नाईक |
| सदस्य | : | कु. दिवाकर शिरोडकर |
| | | कु. विश्वनाथ आमोणकर |


## अभिनंदन



संस्कृती प्रतिष्ठानतर्फे अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त देवेंद्र फडणीस यांच्या हस्ते डॉ. रघुनाथ माशेलकर यांना 'अटल संस्कृती गौरव पुरस्कार' देण्यात आला. यावेळी चंद्रकांत पाटील, गिरीश बापट आणि मान्यवर. डॉ. माशेलकर यांना पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेतर्फे अभिनंदन व शुभेच्छा.



डॉ. राजेंद्र बोरकर यांची Directorate of health serv मध्ये प्रमुख वैद्यकिय अधिकारी (सीएमओ) म्हणून बढती मिळाल्याबद्दल संस्थेतर्फे अभिनंदन व शुभेच्छा.



**सन्मीत्र भरत नाईक,** मडगाव

यानी एनआयटी गोवा, एमटेक मध्ये सुवर्ण पदक मिळवून यश संपादन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.



**कु. संजना सुभाष नाईक**

फार्मसी मध्ये ८७% मिळवून यश संपादन केल्याबद्दल हिचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छ.

# नूतन सभासदांचे हार्दिक स्वागत!!

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीकांत श्रीपाद शिरगांवकर | घर नं. २७, सोनुस, होंडा-सत्तरी | सत्तरी |
| २. | श्रीया श्रीकांत शिरगांवकर | घर नं. २७, सोनुस, होंडा-सत्तरी | सत्तरी |
| ३. | श्रीराम श्रीपाद शिरगांवकर | घर नं. २७, सोनुस, होंडा-सत्तरी | सत्तरी |
| ४. | श्रीमती श्रीपाद शिरगांवकर | घर नं. २७, सोनुस, होंडा-सत्तरी | सत्तरी |
| ५. | अभिनव सिताराम काटकर | घर नं. १, वाळपई, सत्तरी | सत्तरी |
| ६. | प्रतिभा पांडुरंग नाईक | घर नं. ४/३, रीवे, ठाणे-सत्तरी | सत्तरी |
| ७. | प्रेमनाथ कृष्णा नाईक | घर नं. ३७ झर्मे, सत्तरी-गोवा | सत्तरी |
| ८. | स्वप्ना प्रेमनाथ नाईक | घर नं. ३७ झर्मे, सत्तरी-गोवा | सत्तरी |
| ९. | नरेंद्र कृष्णा नाईक | श्रीराम देवळा जवळ, खडकी | सत्तरी |
| १०. | परेश शंकर नाईक | घर नं. ६२, देऊळवाडा, पिसुर्ले | सत्तरी |
| ११. | वसंत विष्णू नाईक | घर नं. ६१, देऊळवाडा, पिसुर्ले | सत्तरी |
| १२. | सुजाता शांता बांदेकर | घर नं. ५२/५ शेवळे, आदने, बाळ्ळी | केपे |
| १३. | जयेश पंढरी देविदास | देऊळवाडा, आडने, बाळ्ळी, कुंकळी | केपे |
| १४. | जोत्स्ना जयेश देविदास | देऊळवाडा, आडने, बाळ्ळी, कुंकळी | केपे |
| १५. | नमिता रविंद्र देविदास | देऊळवाडा, आडने, बाळ्ळी, कुंकळी | केपे |
| १६. | दत्ता महादेव देविदास | आडने, बाळ्ळी, कुंकळी-गोवा | केपे |
| १७. | राजदिप सुनील फातर्पेकर | फातर्पा, कुंकळी - गोवा | केपे |
| १८. | अविनाश विनायक फातर्पेकर | कुंकळकरीण देवळाजवळ, फातर्पा | केपे |
| १९. | सुचिता अविनाश फातर्पेकर | कुंकळकरीण देवळाजवळ, फातर्पा-गोवा | केपे |
| २०. | निशा शुक्लेश फातर्पेकर | कुंकळकरीण देवळाजवळ, फातर्पा-गोवा | केपे |
| २१. | रिलेश सुशांत देविदास | दारवटे, फातर्पा-गोवा | केपे |
| २२. | रोहन एस. साखळकर | ११७, बार्सेम-गोवा | केपे |
| २३. | सिद्धांत सुधाकर बाळ्ळीकर | घर नं. ३८६/१, वेळीपवाडा, बाळ्ळी | केपे |
| २४. | संयोगिता लक्ष्मीकांत बाळ्ळीकर | घर नं. २७०, देऊळवाडा, बाळ्ळी-केपे | केपे |
| २५. | संतोष धनंजय सुर्लीकर | सेंट्रल गॅरेज सांतइनेज, पणजी | तिसवाडी |
| २६. | सलोनी चेतन आमोणकर | घर नं. १४१-ई, मळा, फॉन्तीनेज, पणजी | तिसवाडी |
| २७. | सिमरन संकेत काकोडकर | सी-१६, ३९/१, दत्त मंदिराजवळ, चिंचोळे | तिसवाडी |
| २८. | निधी प्रदीप तिवरेकर | घर नं. ४३, मळा लेक जवळ, मळा | तिसवाडी |
| २९. | प्रिया प्रदीप तिवरेकर | घर नं. ४३, मळा लेक जवळ, मळा | तिसवाडी |
| ३०. | शितल आर. नाईक | ८/१२ आल्तीनो-पणजी | तिसवाडी |
| ३१. | रतन जी. नाईक | ई/११० मळा-पणजी | तिसवाडी |

| | | |
|---|---|---|
| ३२. सोनल सचिन विर्डीकर | घर नं. २३०/२ व्हडलेभाट-सांताक्रुझ | तिसवाडी |
| ३३. राधा संजीव नाईक | घर नं. १८६, मानसवाडा, रायबंदर | तिसवाडी |
| ३४. वैष्णवी वासुदेव विर्डीकर | उत्तम निवास, घर नं. २३०/२ व्हडले भाट, | तिसवाडी |
| ३५. इंदिरा नारायण नाईक | मडकईकर कॉलनी, बेलाबिस्ता, खोर्ली-ओल्डगोवा | तिसवाडी |
| ३६. सौरभ उल्हास गायक | घर नं. १९३, श्रीस्थळ काणकोण-गोवा | काणकोण |
| ३७. सांभवी सौरभ गायक | घर नं. १९३, श्रीस्थळ काणकोण-गोवा | काणकोण |
| ३८. कामिनी मोहन काणकोणकर | घर नं. ४, तिंडले, काणकोण-गोवा | काणकोण |
| ३९. तुळशिदास सुरेश नाईक | घर नं. १०९/४, निरंकार देवळाजवळ, तिंडले, | काणकोण |
| ४०. तन्वी तुळशीदास काणकोणकर | घर नं. ९८, किंडळे, काणकोण-गोवा | काणकोण |
| ४१. प्रणिता प्रल्हाद काणकोणकर | घर नं. ९७, किंडळे, काणकोण-गोवा | काणकोण |
| ४२. राजेश सदानंद पैंगिणकर | वेळवाडा, पैंगिण, काणकोण-गोवा | काणकोण |
| ४३. उमेश पैंगिणकर | घर नं. ९१३/ए, वेळवाडा, पैंगिण | काणकोण |
| ४४. अमिता आनंद पैंगिणकर | घर नं. ८८१/८, वेळवाडा, पैंगिण | काणकोण |
| ४५. सविता सदानंद पैंगिणकर | वेळवाडा, पैंगिण-काणकोण | काणकोण |
| ४६. सुष्मिता सुशांत लोलयेकर | वेळवाडा, पैंगिण-काणकोण | काणकोण |
| ४७. वैशाली मनोहर पैंगिणकर | वेळवाडा, पैंगिण-काणकोण | काणकोण |

## सहवेदान

दुखःद निधन झालेल्या समाज बांधवांच्या आत्म्यास शांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.



**स्व. सूर्यकांत मांद्रेकर,** देऊळवाडा, मांद्रे-पेडणे यांचे दि. १२-११-२०२० रोजी दुःखद निधन झाले. ते पेडणे तालुका महिला समिती, सचिव सौ. प्रिती प्रशांत मोरजकर यांचे वडिल होत.

\- - - -



**डॉ. अर्चना काकोडकर,** करंजाळ, पणजी यांचे दि. १८-१२-२०२० रोजी दुःखद निधन झाले. त्या सन. १९९५ ते २०१९या काळात संस्थेच्या सचिव होत्या.

\- - - -

**श्री. प्रसाद (प्रकाश) म्हार्दोळकर,** म्हार्दोळ - फोंडा यांचे दि. २७-१२-२०२० रोजी दुःखद निधन झाले.

## शैक्षणिक कर्ज-छाननी समिती २०२०-२३

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. उमेश अच्युत नाईक | ९२८४१९८१४६ |
| २. | श्री. गोरख राजाराम मांद्रेकर | ९९६०४०१९२० |
| ३. | श्री. भालचंद्र आमोणकर | ९९७०५४८९४७ |
| ४. | श्री. आनंद जी. वाघुर्मेकर | ९८२३०३५१५१ |
| ५. | श्री. सतिश पैंगिणकर (समन्वयक) | ९४२३१८०५२५ |

## वचक समिती २०२०-२३

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रमोद नाईक | ९३२५४०७३६७ |
| २. | श्री. दयानंद नाईक | ९४२१२४००३४ |
| ३. | श्री. रमाकांत बांदेकर | ९४२११५२१०९ |
| ४. | श्री. सुरेश उगवेकर | ९८८६४३७३६६ |
| ५. | श्री. प्रमोद केरकर | ८००७५३१३३९ |

## ओबीसी समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद वाघुर्मेकर | अध्यक्ष | ९८२३०३५१५१ |
| २. | श्री. मंगेश कुंडईकर | सचिव | ९८२२१२१८९४ |
| ३. | श्री. रितेश नार्वेकर | | ९८२२१०२९६० |
| ४. | श्री. लक्ष्मण मोरजकर | | ८८०५६९७५३३ |
| ५. | श्री. अशोक नाईक | | ९०४९५९८९३१ |
| ६. | श्री. संदेश नाईक | | ९७६३३०२९२४ |
| ७. | श्री. हरिश्चंद्र खोलकर | | ९४२३८३६०८२ |
| ८. | श्री. कृष्णा तोरस्कर | | ७०२०९६६४२८ |
| ९. | श्री. समिर चिखलीकर | | |
| १०. | श्री. गणपत देविदास | | ९४०५६६१७४४ |

## सल्लागार समिती

| | | |
|---|---|---|
| १. | ॲड. मनोज आनंद बांदोडकर | ९८२२०४५३९१ |
| २. | श्री. सुभाष तुकाराम साळकर | ९८२३६२७२२० |
| ३. | श्री. उमेश अच्चुत नाईक | ९२८४१९८१४६ |
| ४. | श्री. विजय म्हार्दोळकर | ९०४९४६०९०३ |
| ५. | श्री. दिनेश शबानी नाईक | ९४२३०६१३३४/८३८०९१९०१४ |
| ६. | श्री. किरण व्ही. नाईक | ९४२२०५८६९७ |
| ७. | श्री. किशोरचंद्र कोरगांवकर | ९४२२०५८६९८ |
| ८. | श्री. मोहन दत्ताराम वेलगेकर | ९४२०४२८६७६ |
| ९. | श्री. किरण व्यंकटेश बाळ्ळीकर | ९९२२४१५०१५ |
| १०. | सौ. सुविधा सुदीप कोरगांवकर | ७७६८९५९४०७ |
| ११. | सौ. सुवर्णा जांबळीकर | ९९२३८८८९४८ |

## तांत्रिक समिती २०२०-२०२३

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नंदकिशोर विश्वनाथ शिरगांवकर | ८८८८७८८२४६ |
| २. | श्री. विवेक परिसनाथ नाईक | ९४२३०५८३८५/९५११२१६३८६ |
| ३. | श्री. लक्ष्मीकांत बाळ्ळीकर | ९७६४५९९००५ |
| ४. | श्री. प्रशांत माशेलकर | ९९७३०३८०५३ |

# गोमंतक मराठा समाज - गोवा


-: चिटणीस :-

**श्री. मंगेश भि. कुंडईकर**

मो. : ९८२२१२१८९४

-: सं. चिटणीस :-

**श्री. सतीश अ. पैंगिणकर**

मो. : ९४२३१८०५२५

-: मुखपत्र समन्वयक :-

**श्री. सुनील फातर्पेकर**

मो. : ९९२१०१६१४८

दयानंद स्मृती, स्वामी विवेकानंद मार्ग, पणजी-गोवा
४०३००१, दूरध्वनी - (०८३२) २२२६०९९
Email : gomantakmarathasamajgoa@gmail.com
Website : www.gomantakmarathasamajgoa.com

-: संपादक :-

**श्री. नीतीन वि. कोरगावकर**

मो. : ९४२२४४३५१८

-: व्यवस्थापक, मुद्रक व प्रकाशक :-

**श्री. आनंद घ. वाघुर्मेकर**

यांनी गोमंतक मराठा समाज - गोवा करिता दयानंद स्मृती
पणजी-गोवा येथे प्रकाशित केले.

-: छपाई :-

**शरद एन्टरप्रायझेस**

ओल्डगोवा, मोबाईल - ९८८१४०९२३७